2-1 KDAY

(1)

# महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ

सिडको भवन (दक्षिण कक्ष) १ ला मजला, बेलापूर, नवी मुंबई, ४०० ६१४.

क्र.मपापुजनिमं.1093/राभा.60/आ-5.

1993/07/02.

प्रति,

1) अध्यक्ष,
म.पा.पु.व ज.नि.मंडळ,
(मा.मंत्री, नगर विकास)
मुंबई.

2) उपाध्यक्ष,
म.पा.पु.व .नि.मंडळ,
(मा.राज्यमंत्री, ग्राम विकास)
मुंबई.

3) श्री.सुरेश कुमार,
सचिव,
ग्राम विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई.

4) श्री.एम.बी.चौबे,
आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

5) श्री.एस.एन.पानसरे,
उपसचिव (खर्च)
वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई.

6) श्री.जगन्नाथ शिवलींग पाटील,
सदस्य,
जिल्हा परिषद, सोलापूर,
सोलापूर.

7) श्री.गणेश रॉय,
सदस्य,
अध्यक्ष, चांदूररेल्वे नगरपरिषद,
चांदूररेल्वे, जि. अमरावती.

8) श्री.रा.मा.सगणे,
सदस्य सचिव,
म.पा.पु.व ज.नि.मंडळ,
एक्सप्रेस टॉवर्स,
मुंबई.

विषय : दिनांक 20.5.93 रोजी झालेल्या मंडळाच्या 60 व्या सभेचे इतिवृत्त.

दिनांक 20.5.93 रोजी झालेल्या मंडळाच्या 60 व्या सभेचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत आहे.

वरील इतिवृत्ताबदल आपले काही अभिप्राय असल्यास ते या कार्यालयास पाठवावे म्हणजे ते मंडळाच्या पुढील सभेत विचारासाठी ठेवण्यात येतील.

आपला विश्वासू,

(ज. बा. आंबेगावकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत : इतिवृत्त पृ. 1 ते 7.

प्रत :- इतिवृत्त सविनय व अवलोकनार्थ सादर.

1) श्री.डी.टी.जोसेफ,
सचिव - 1,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई.

2) श्री.एम.आर.अगरवाल,
अ 1/5 अगरशेन सोसायटी,
8 कोरेगाव पार्क,पुणे 1

3) श्री.पी.अस.राजवंशी,
भारत सरकारचे सल्लागार,
मध्यवर्ती सार्वजनिक आरोग्य स्वच्छता संस्था,
नगर विकास मंत्री, नवी दिल्ली.

प्रत :- इतिवृत्त माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना,

1) मा.मुख्य अभियंता (नागरी) / (ग्रामीण) / (प्रकल्प), म.पा.पु.व ज.नि.मंडळ,मुंबई 1.
2) मा.वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.पा.पु.व ज.नि.मंडळ, नवी मुंबई.
[illegible]
4) अधीक्षक अभियंता, मुख्यालय/ सी.पी.डी.एम./ जागतिक बँक./ गुण नियंत्रण कक्ष.
5) उप मुख्य लेखा अधिकारी 1/2/3.

आस्थापना अधिकारी (दक्षता)
प्रशासकीय नि आस्थापनाप अधिकारी
मध्यवर्ती कार्यालयातील इतिवृत्ताच्या संबंधित कार्यासन अधिका-यांच्या माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

(3)

दिनांक 20.5.1993 (गुरुवार) रोजी झालेल्या महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या 60 व्या सभेचे इतिवृत्त.

---

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाची 60 वी सभा गुरुवार दिनांक 20.5.1993 रोजी मा.नगर विकास मंत्री व मंडळाचे अध्यक्ष अरुणलालजी गुजराथी यांचे अध्यक्षतेखाली समिती कक्ष, 6वा मजला, मंत्रालय येथे संपन्न झाली. या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | माननीय अरुणलाल गुजराथी,<br>मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष. | अध्यक्ष. |
| 2. | माननीय माणिकराव ठाकरे,<br>राज्यमंत्री ग्राम विकास व मंडळाचे उपाध्यक्ष | उपाध्यक्ष. |
| 3. | श्री. सुरेश कुमार<br>सचिव,<br>ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32 | सदस्य |
| 4. | श्री. एस. एन. पानसरे<br>उप सचिव (खर्च), वित्त विभाग<br>मंत्रालय, मुंबई 32 | सदस्य |
| 5. | श्री. एम. बी. चौबे<br>आयुक्त,<br>ठाणे महानगरपालिका ठाणे. | सदस्य |
| 6. | श्री. जगन्नाथ शिवलींग पाटील | सदस्य |
| 7. | श्री. गणेश रॉय | सदस्य |
| 8. | श्री. आर. एम. सगणे | सदस्य सचिव |

मंडळाचे खालील सदस्य मंडळाच्या बैठकीसाठी उपस्थित राहू शकत नसल्याचे त्यांनी कळविले असल्याने त्यांची रजा मंजूर करणेत आली.

1. श्री. डी. टी. जोसेफ,
   सचिव (1),
   नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई 32.
2. श्री. एम. आर. अगरवाल,
   अे 1/5 अगरशेन सोसायटी,
   8, कोरेगांव पार्क,पुणे 1.
3. श्री. पी. अेस. राजवंशी,
   भारत सरकारचे सल्लागार ,
   मध्यवर्ती सार्वजनिक आरोग्य स्वच्छता संस्था,
   नगर विकास मंत्री, नवी दिल्ली.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाचे खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. अे. अे. संकपाळ | मुख्य अभियंता (ग्रामीण) |
| 2. | श्री. एस. डी. अरमाळ | मुख्य अभियंता ( प्रकल्प ) |
| 3. | श्री. के. आर. ताम्हाणे | वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी |
| 4. | श्री. आर. अेस. पिसे | मुख्य प्रशासकीय अधिकारी |

xxxxxxxxxxx

मंडळाचे अध्यक्ष व मंत्री नगरविकास यांना बैठकीतील विषयावर चर्चा सुरु करण्याची सूचना सदस्य सचिवांना केली. त्यानंतर सदस्य सचिवांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. आणि नंतर विषयवार चर्चेला सुरुवात करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्रमांक 1**

मंडळाच्या दिनांक 30.3.1993 रोजी झालेल्या 59 व्या बैठकीच्या इतिवृत्ताला दुजोरा देणे

मंडळाच्या 59 व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व सदस्यांना पाठविण्यांत आले होते. या इतिवृत्तावर कोणीही सूचना अथवा दुरुस्ती सुचविलेली नाही असे सदस्य सचिवांनी निदर्शनास आणले. त्यानंतर चर्चा होऊन सदर इतिवृत्ताला दुजोरा देण्यांत आला.

**कार्यक्रमबाब क्रमांक 2**

**मंडळाच्या 59 व्या बैठकीतील इतिवृत्तावर केलेली कार्यवाही**

मंडळाच्या 59 व्या बैठकीतील निर्णयांवर काय कार्यवाही करण्यांत आली याचा खुलासा सदस्य सचिवांनी केला. त्या पैकी काही विषय पुन्हा मंडळाच्या 60 व्या बैठकीसमोर चर्चेसाठी ठेवण्यांत आले आहेत हेहि त्यांनी निदर्शनास आणले. सर्व सदस्यांनी, केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली.

कार्यक्रमबाब क्रमांक 3

वार्षिक प्रशासन अहवाल 1989-90

सदस्य सचिवांनी 1989-90 च्या वार्षिक प्रशासन अहवालातील महत्वाच्या बाबींचे स्पष्टीकरण केले. हा अहवाल फार उशिरा मंडळासमोर सादर करण्यांत येत आहे, या बद्दल मा. मंत्री (नवि) यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच 1987-88, 1988-89 या वर्षाचे प्रशासन अहवाल अजून महाराष्ट्र विधी मंडळासमोर ठेवण्यांत आलेले नाहीत,हेहि निदर्शनास आणण्यांत आले. अध्यक्षांनी अशी सूचना केली की, 1990-91 व 91-92 या वर्षाचे वार्षिक प्रशासन अहवाल त्वरित तयार करून ते मंडळाच्या पुढील बैठकीस मान्यतेसाठी ठेवण्यांत यावेत व 1987-88 ते 91-92 या 5 वर्षांचे सर्व प्रशासन अहवाल एकदमच महाराष्ट्र विधी मंडळाच्या पुढील (पावसाळी) अधिवेशनात ठेवण्यांत यावे.

चर्चेच्या वेळी मंत्री महोदयांनी असेही निदर्शनास आणले की, मंडळाच्या 59 व्या बैठकीत, 1989-90 च्या ऑडीट रिपोर्ट संबंधी महालेखापाल यांनी आक्षेप घेतले आहेत/ त्यांची परिपूर्ती करण्यासाठी एक समिती नेमण्यांत आली होती. त्या समितीच्या बैठका त्वरित घेण्यांत याव्यात व त्या अहवालाला अंतिम स्वरुप देण्यांची विनंती महालेखापालांना करण्यांत यावी. तसेच 1990-91 व 1991-92 या वर्षाचे ऑडीट रिपोर्टहि त्वरित तयार करुन घेण्यांत यावेत. चर्चेअंती खालील ठराव मंजूर करण्यांत आला.

ठराव:- असा ठराव करण्यांत येतो की, मंडळाच्या 1989-90 या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालाला मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे. आणि सदस्य सचिवांना सदर अहवाल निधीमंडळापुढे ठेवण्यासाठी शासनाला पाठविण्याचे अधिकार देण्यांत येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.4 : कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेसाठी हुडकोकडून रु.125.89 लाख एवढे कर्ज घेणे.**

या विषयाची संपूर्ण पार्श्वभूमी सदस्य सचिवांनी स्पष्ट करुन सांगितली. चर्चेमध्ये श्री.चौबे असे म्हणाले की, या योजनेखाली शौचकूप तयार करण्याचे काम हे मंडळाचे नसून म्हाडाचे आहे. सदस्य सचिव यांनी असे स्पष्टीकरण केले की, आपण हे काम प्रत्यक्ष कार्यान्वयीत करत नसून फक्त निधीचे वाटप इ.बाबत नोडल एजन्सी म्हणून शासनाच्या आदेशान्वये करत आहेत. चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

ठरावः- असा ठराव करण्यांत येतो की, कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेखाली शौचकूप तयार करण्यासाठी हुडकोकडून रु.125.89 लक्ष इतके कर्ज घेण्यांत यावे.

**कार्यक्रम बाब क्र.5 : मंडळातर्फे पाणी पुरवठा होत असलेल्या प्रकल्प क्षेत्रातील पाणी पुरवठा योजनांसाठी पाण्याचे दर, 1993-94 साठी सुधारित करण्याबाबत.**

या विषयाची पार्श्वभूमी सदस्य सचिवांनी नमूद केली. चर्चेच्यावेळी उपाध्यक्ष यांनी असे सुचविले की, या पुढे कार्यक्रम बाबी टिपण्या तसेच मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त आदी मंडळाच्या बैठकीची सर्व कामे मराठीतून करण्यांत यावीत. या सूचनेस मंडळाचे अध्यक्ष व मंत्री (नवि) यांनी मान्यता दिली. व या पुढे मंडळाच्या बैठकीची सर्व कामे व प्रस्तावांचे लिखाण मराठीतून करण्यांत यावे असे आदेश दिले. पाण्याचे दर कोणत्या आधारावर सुधारण्याचा प्रस्ताव आहे याचा खुलासा करण्यांत आला. सदस्य सचिवांनी असेही निदर्शनास आणले की, सामान्यपणे पाणी पुरवठा योजनेची देखभाल करण्याचे काम हे मंडळाचे नाही. मंत्री (नवि) यांनी असेही नमूद केले की, फक्त पाणी पुरवठा योजनेचे बांधकाम करणे एवढेच मंडळाचे नियमित काम आहे. ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री.चौबे यांनी असे सुचविले की, फक्त इएसआर पर्यन्त पाणी पुरवठा मंडळाने करावा व त्या पुढील पाण्याच्या वितरणाचे सर्व काम संबंधित नगरपालिका व स्थानिक संस्थानी करावे. या सूचनेला सर्व सामान्यपणे संमती देण्यांत आली. व तसे प्रयत्न करण्याची सूचना मंत्री(नवि) यांनी केली. राज्यमंत्री ग्राम विकास व मंडळाचे उपाध्यक्ष यांनी या पाण्याच्या दराची सुधारणा कोणत्या तत्वावर करण्यांत येत आहे याची विचारणा केली, नंतर सदस्य सचिवांनी व मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी याबाबत खुलासा केला. राज्यमंत्र्यांनी अशी सूचना केली की, या पाण्याच्या दराची 100 टक्के वसूली होणे आवश्यक आहे. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी मुंबई महानगरपालिका,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व महा.पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ येथील पाण्याच्या दराचे विश्लेषणाचे तुलनात्मक आकडे वाचून दाखविले. मुंबई महानगरपालिकेचे पाण्याचे दर हे कमी आहेत. कारण त्यांची उत्पादन खर्च (production cost) कमी आहे. विजेचा त्यांना खर्च जवळ जवळ नाहीच. सर्व पाणी गुरुत्वाकर्षणाने जाते. राज्यमंत्री, ग्राम विकास यांनी असे सुचविले की, सुधारित दर दि. 1 जुलै,1993 पासून लागू करण्यांत यावेत. हे मान्य करण्यांत आले. चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

**ठराव :-** असा ठराव करण्यांत येतो की, प्रकल्प क्षेत्रातील लाभ धारकांना पुरविण्यांत येणा-या पाण्याच्या कार्यक्रम बाब टिपणीमध्ये दर्शविलेल्या सुधारित दरास, मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे. हे सुधारित दर दिनांक 1 जुलै,1993 पासून अंमलात यावेत.

**कार्यक्रम बाब क्र.6 : प्रकल्पबाहय क्षेत्रातील पाणी पुरवठयाचे दर 1993-94 साठी सुधारित करणे.**

1993-94 साठी पाणी पुरवठयाच्या दरात सुचित करण्यांत आलेली सुधारणा कोणत्या निकषावर प्रस्तावित करण्यांत आली आहे, याबाबत सदस्य सचिवांनी खुलासा केला. हे दर फार जास्त वाटतात. तेव्हा हे दर 10 पैशांनी कमी करता येतील किंवा कसे याची विचारणा राज्यमंत्री,ग्राम विकास यांनी केली. त्यावर सदस्य सचिवांनी असा खुलासा केला की, जर 10 पैसे कमी केले तर 10 लक्ष रुपयाची तूट येईल. त्यामुळे दर कमी करणे योग्य होणार नाही. आयुक्त, महानगरपालिका ठाणे यांनी असे सुचविले की, ज्यांच्याकडे जास्त प्रमाणात प्रॉपर्टी किंवा जमीन आहे, व जे जास्त पाण्याचा दर देऊ शकतात, अशांकडून जास्त प्रमाणात पाण्याचे दर घेण्यांत यावेत. यासाठी एक टिपणी मंत्री मंडळासमोर सादर करण्याची सूचना मंत्री(नवि) यांनी केली. अजेंडा टिपणी मध्ये 20 टक्के वाढीची व 25 टक्के वाढीचे असे 2 दर सुचविण्यांत आले आहेत. या पैकी कमी असलेला म्हणजे 20 टक्के वाढीचा दर मान्य करण्यांत आला. चर्चेअंती खालील ठराव मंजूर करण्यांत आला.

**ठराव:** असा ठराव करण्यांत येतो की, प्रकल्पबाहय क्षेत्रातील ग्राहकांसाठी 1993-94 साली पाण्याचा सुधारित दर अजेंडा टिपणीत दर्शविल्याप्रमाणे फक्त 20 टक्के वाढीचा मान्य करण्यांत आला. हे सुधारित दर 1 जुलै,1993 पासून लागू करण्यांत यावेत.

**कार्यक्रम बाब क्र.7 : न्हावा शेवा पाणी पुरवठा योजनेतून पुरविण्यांत येणा-या पाण्याच्या दराची 1993-94 साठी सुधारणा करणे.**

या विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. चर्चेअंती अजेंडा टिपणीतील प्रस्तावित सुधारित दर मान्य करण्यांत आला. आणि खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

**ठराव :** असा ठराव करण्यांत येतो की, न्हावा शेवा पाणी पुरवठा योजनेतून पुरविण्यांत येणा-या पाण्याचा दर 1000 लिटरसाठी रु.5.65 असा असावा. हा सुधारित दर दिनांक 1.7.1993 पासून लागू करण्यांत यावा. अजेंडा टिपणीमध्ये दर्शविलेल्या इतर अटीही मान्य करण्यांत आल्या.

**कार्यक्रम बाब क्र.8 : नागरी पाणी पुरवठा योजनांचा आढावा.**

**कार्यक्रम बाब क्र.9 : ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा आढावा.**

मंडळ राबवित असलेल्या सर्व नागरी आणि ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा मंडळाने तयार केलेला आढावा चर्चेस घेण्यांत आला व त्यावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. सचिव, ग्राम विकास विभाग यांनी असे सुचविले की, या आढाव्यात योजना मंजूर कधी झाली, सुरु कधी झाली, कधी पूर्ण होणार ही माहिती मुख्यत्वाने दिली पाहिजे. विशेषतः ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा वरचेवर आढावा घेण्यांत येत नाही व त्यामुळे या योजनांना फार विलंब होतो असे त्यांनी निदर्शनास आणले. मा.राज्यमंत्री,ग्राम विकास यांनी ग्रामीण योजनांना फारच विलंब होतो असे सांगून नाराजी व्यक्त केली. यवतमाळ जिल्हयातील टाकीची कामे हाती घेतलेली नाहीत. त्यावर डीएसआर दर, टेंडर्स इत्यादी बाबतीतील अडचणीबद्दल आढावा घेण्याचे सदस्य सचिवांनी मान्य केले. व निधीचे अभावी होणारा विलंब टाळण्यासाठी काय करण्यांत यावे यावर विचार करण्याची सूचना केली. ग्रामीण योजनांसाठी असलेले पैसे नागरी योजनांकडे वळविले जावू नये यासाठी दि.1.4.93 पासून शहरी व ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांसाठी वेगळे बँक अकाऊंटस ठेवण्यांत आले आहेत असे सदस्य सचिवांनी नजरेस आणले. या योजनांना विलंब का होतो याचा वरचेवर आढावा घेणे आवश्यक आहे. असे मंत्री(नगर विकास) यांनीही सुचविले. तसेच या आढाव्यामध्ये किती योजना मंजूर झाल्या, त्यांना किती निधी उपलब्ध करुन देण्यांत आला, किती योजनांचे सर्वेक्षण करण्यांत आले, किती योजना प्रलंबित आहेत, आणि पुढे कोणत्या योजना हाती घेण्याचा प्रस्ताव आहे, ही सर्व माहिती देण्याची सूचना मंत्री(नवि) यांनी केली. त्यांनी असेही सुचविले की, जिल्हयाच्या पालक मंत्र्यांनी त्यांच्या जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांचा आढावा घेतला पाहिजे. राज्यमंत्री, ग्राम विकास यांनी असे सुचविले की, जिल्हावार आढावा घेण्याऐवजी प्रत्येक विभागातील योजनांचा सविस्तर आढावा मंडळाच्या विभागवार बैठकीत घेण्यांत यावा. व निदान वर्षातून एकदातरी प्रत्येक विभागाचा आढावा घेण्यांत यावा. ही सूचना मान्य करण्यांत आली. व अमरावती विभागातील ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांचा आढावा दि.25 जून,93 रोजी अमरावती येथे घेण्यांत यावा असे ठरविण्यांत आले.

कार्यक्रम बाब क्र.10 :- तात्पुरत्या पदांचे स्थायी पदांत रुपांतर.

या विषयाची पार्श्वभूमी सदस्य सचिवांनी विषद केली. अशा तात्पुरत्या पदांचे स्थायी पदांत रुपांतर करणे शासकीय नियमानुसार आवश्यक आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव शासनाकडे पाठवावा असे ठरविण्यांत आले. चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

**ठराव:-** असा ठराव करण्यांत येतो की, अजेंडा टिपणीत दर्शविल्याप्रमाणे 1734 तात्पुरत्या पदांचे स्थायी पदांत रुपांतर करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच या प्रस्तावास शासनाची मान्यता मिळविण्यासाठी सदस्य सचिवांना अधिकार देण्यांत येत आहेत.

कार्यक्रम बाब क्र.11 : **वसुली अधिकारी व त्यांचे कर्मचारी यांची पदे 1993-94 साठी पुढे चालू ठेवणे.**

ही पदे निर्माण केल्यामुळे मंडळाच्या होणा-या वसूलीत चांगलीच भर पडली आहे. त्यामुळे ही पदे पुढे चालू ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे ही पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यांत आली. व खालील ठराव मंजूर करण्यांत आला.

**ठराव** : असा ठराव करण्यांत येतो की, वसुली कक्षासाठी निर्माण केलेली पदे 1993-94 साठी पुढे चालू ठेवण्यांत यावीत. ही पदे पुढे चालू ठेवण्यास शासनाची मंजूरी मिळविण्याचे अधिकार सदस्य सचिवांना देण्यांत येत आहेत.

चर्चेच्या अखेरीस काही माननीय सदस्यांनी असे निदर्शनास आणले की,मंड़ळाच्या योजनांना भेटी देण्यासाठी त्यांना आवश्यक त्या सुविधा व वाहने पुरविली जात नाहीत. त्यावेळी मंत्री(नवि) व मंडळाचे अध्यक्ष यांनी असे सुचविले की, मंडळाच्या सदस्यांना त्या त्या विभागातील योजनांना भेटी देण्यासाठी आवश्यकते नुसार महिन्यातून निदान 5 दिवस मंडळाचे वाहन उपलब्ध करुन देण्यांत यावे. या सूचनेस सर्वांनी मान्यता दिली. याबाबत सूचना देण्याचे सदस्य सचिवांनी मान्य केले.

या नंतर अध्यक्षांचें आभार मानून सभा समाप्त झाली.